

जीवनात नेहमी प्रामाणिक रहा, कारण प्रामाणिकतेचा नेहमीच विजय होतो.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १३ मार्च २०२५ | अंक ९४० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

लाडक्या बहिणीच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांची सरकारवर टीका

मी आरक्षण मागतोय म्हणजे मला विनाकारण जातीवादी ठरवू नका. तुम्ही मागितलं त्यावेळी आम्ही तुम्हाला जातीवादी म्हटलं नाही. फक्त गरिबांच्या लेकरासाठी आरक्षण लागतं म्हणून मागत आहे. तुम्ही आमच्या आरक्षणाला विरोध करताय म्हणजे तुम्ही जातीवादी आहात, असा हल्लाच जरांगे यांनी चढवला.

राज्याचा अर्थसंकल्प काल सादर करण्यात आला. सरकार बजेटमध्ये लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा करेल असं सांगितलं जात होतं. पण सरकारने कोणतीही तरतूद केली नाही. त्यामुळे लाडक्या बहिणींचा हिरमोड झाला आहे. या मुद्द्यावरून आता मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला धारेवर धरलं आहे. सरकारचं आता भागलं आहे. त्यामुळेच लाडक्या बहिणींसाठी बजेटमध्ये काहीच दिलं नाही. उलट लाडक्या बहिणींना अपात्रतेच्या नावाखाली योजनेतून काढलं जात आहे, अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली. ते मीडियाशी बोलत होते. सरकारने शेतकऱ्यांना काहीच दिलं नाही. कर्जमाफी नाही आणि कर्जमुक्तीही नाही. गोरगरिबाच्या आरक्षणाचा प्रश्नही मार्गी काढला नाही. म्हणजे किती गोड बोलून मान कापली जाते. त्यामुळे इथून पुढे सांगायचं कमी, बोलायचं कमी आणि अचानक आंदोलन करायचे या भूमिकेशिवाय सरकार आता ठिकाणावर येणार नाही, असा इशारा जरांगे यांनी दिला. शंभर टक्के सरकारकडून फसवणूक झालेली आहे. योग्य वेळी योग्य होणं गरजेचं होतं. त्यावेळी आम्हाला ओबीसी आरक्षणात जायचं होतं आणि ओबीसींच्या कायद्यात दुरुस्ती करायची असेल तर त्याची अधिसूचना सरकारने काढली

बहीण ही बहीण असते:

सरकार निवडून येईपर्यंत किती पाया पडत होतं. किती लाडक्या बहिणींना पैसे दिले. अगदी तिसऱ्या तळात राहणाऱ्या लाडक्या बहिणीला सुद्धा पैसे दिले. मग आज का या लाडक्या बहिणींना बाहेर काढायला लागले? याचा अर्थ त्यांचा आता भागलंय. त्यामुळे त्यांना आता फक्त गोड बोलायचं. मात्र करायला चुकायचं नाही. त्यांच्याकडे जसा कावा आहे, तसा गोरगरिबांकडे सुद्धा आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. एक मार्ग म्हणजे सरकार गोरगरिबांना कळू देत नाही. शेवटी बहीण ही बहीण असते. त्यामुळे तिला का बाहेर काढलं? असा सवाल त्यांनी केला.

आरोपींची ओळख परेड व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पहिली सुनावणी झाली

बीड। प्रतिनिधी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामध्ये न्यायालयामध्ये चारशिट दाखल झाल्यानंतर केज न्यायालयात आज पहिल्यांदा सुनावणी झाली. या सुनावणी दरम्यान आरोपींची ओळख परेड व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारेच झाली असून आरोपीच्या वकीलांनी खटल्या संदर्भातील वेगवेगळी माहिती मागितली. दरम्यान सरकारी वकील म्हणून नियुक्त केलेले ॲड.उज्वल निकम मात्र पहिल्या सुनावणी दरम्यान उपस्थितीत नव्हते. मागील काही महिन्यांपासून संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी आणि तपास यावर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात चर्चा होत होती. या प्रकरणामध्ये चारशिट न्यायालयात दाखल झाल्यानंतर १२ मार्च ही पहिली तारीख मिळाली होती. त्यानुसार केज न्यायालयामध्ये पहिली सुनावणी पार पडली. या सुनावणी दरम्यान सुरक्षेच्या कारणास्तव आरोपींना व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे हजर करण्यात आले. आरोपींची ओळख परेड ही व्हिडीओ कॉन्फरसिंगनेच करण्यात आली. विशेष म्हणजे पहिल्याच सुनावणी दरम्यान आरोपींनी

नव्याने नियुक्त केलेले वकील केज न्यायालयामध्ये उपस्थितीत होते. न्यायालयाने आरोपींना काही प्रश्न विचारत कायदेशीरबाबी पुर्ण झाल्या आहेत की नाही याची माहिती करून घेतली. फिर्यादी पक्षाला देखील तपासावर काही आक्षेप आहेत का? असे न्यायालयाने विचारले. एकुणच आजची पहिली सुनावणी ओळख परेड आणि माहिती मागण्याच्या संदर्भानेच झाली. परंतू पुढची तारीख न्यायालयाने याच महिन्यातील २६ मार्च ही दिली असून आता २६ मार्चला होणारी सुनावणी केज न्यायालयातच होते की सुरक्षेच्या कारणास्तव आणि अन्य काही कारणांमुळे ही सुनावणी बीडच्या न्यायालयात होते हे पहावे लागेल.

कळसंबरमध्ये आपला परिवार वृद्धाश्रमातील वृद्धांना अन्नदान

उद्योजक प्रदीप ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

प्रतिनिधी | बीड दि.12 : तालुक्यातील नेकनूरजवळील कळसंबर येथील आपला परिवार वृद्धाश्रमातील वृद्धांना उद्योजक प्रदीप ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त होळ (ता.केज) येथील धनराज लाटे मित्र मंडळाच्यावतीने सोमवारी (दि.10) अन्नदान करण्यात आले. धनराज लाटे मित्र मंडळाच्या पुढाकारातून नेहमीच सामाजिक उपक्रम राबविले जातात. अंबाजोगाई येथील उद्योजक प्रदीप ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र मंडळाच्यावतीने आपला परिवार वृद्धाश्रमातील वृद्धांना अन्नदान करण्यात आले. यावेळी वृद्धाश्रमाच्या संस्थापक मनिषाताई पवार, वैजनाथ खोडवे, महापरिवर्तन प्रतिष्ठानचे सचिव धनराज लाटे, अध्यक्ष तथा पत्रकार शुभम खाडे यांची उपस्थिती होती.

होळी लहान करा- होळीची पोळी दान करा प्राचार्य डॉ.सविता शेटे

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा बीड च्या वतीने संस्कृती विद्यालय, विवेकवर्धिनी गुरुकुल येथे पर्यावरणपूरक होळी या विषयावर प्राचार्य डॉ सविता शेटे यांचे व्याख्यान झाले. याप्रसंगी पर्यावरणपूरक आणि पर्यावरणाचे संरक्षण करून होळी कशी साजरी करता येईल याबाबत प्राचार्य डॉ. सविता शेटे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. लाकडे तोडून होळी करणे ऐवजी परिसर स्वच्छता करून कचऱ्याची पण लहान होळी करावी. तसेच या होळीमध्ये प्लास्टिक, टायर अशा वस्तूंचा वापर करू नये. होळीची पुरणपोळी गरजू लोकांना दान करून त्यांच्या तोंडी गोड घास द्यावा. तसेच होळी भोवती बोंबा न मारता पर्यावरणाची, महिला सक्षमीकरणाची अशी विविध गाणी म्हणावीत. याचबरोबर कसलेही अपशब्द, शिव्या यांचा वापर टाळावा. या दिवशी प्रत्येकाने स्वतःच्या दुष्कृत्यांची, दुर्गुणांची, वाईट विचारांची आणि सवयींची होळी करावी. सदवर्तन आणि सकारात्मक आचरणाचा संकल्प करावा. त्याचबरोबर धुलीवंदन अथवा रंगपंचमी दिवशी नैसर्गिक रंगांची कोरडी रंगपंचमी खेळावी आणि पाण्याचा अपव्यय टाळावा. रासायनिक रंग आरोग्यास हानिकारक असल्यामुळे नैसर्गिक रंग वापरावेत. सदरील सण साजरा करताना कोणावरही रंगासाठीची जबरदस्ती करू नये, आनंद द्यावा आणि घ्यावा. अशी अमंगलाची होळी करण्याचा संदेश आपल्या व्याख्यानातून दिला. व्याख्यानाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना संकल्प करण्याबाबत माहिती देऊन प्रतिज्ञा देण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन विवेकवर्धिनी गुरुकुलचे प्रमुख श्री दत्ता नलावडे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. तसेच या कार्यक्रमासाठीची तयारी येथील शिक्षक अतुल कुलकर्णी यांनी केली. शाळेतील शिक्षक आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते विजय घेवारे या कार्यक्रमास उपस्थित होते. बहुसंख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती, विद्यार्थ्यांचा शिस्तबद्ध सहभाग आणि उस्फूर्त प्रतिसाद तसेच अत्यंत रम्य असा परिसर यामुळे या कार्यक्रमाची रंगत वाढली. कार्यक्रमाच्या शेवटी होळी लहान करा आणि होळीची पोळी दान करा या घोषणेने विद्यार्थ्यांनी परिसर दणाणून सोडला.

सतिश भोसले उर्फ खोक्याला प्रयागराजमध्ये पकडल

बीड। प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील मारहाणीच्या गुन्ह्यांमधील फरार असलेला आरोपी सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याला बुधवारी सकाळी उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे बेड्या ठोकण्यात आल्या. बीड पोलीस आणि उत्तर प्रदेश पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. सतीश भोसले उर्फ खोक्या भाई प्रयागराज विमानतळावरुन पळण्याच्या तयारीत होता. तेव्हा पोलिसांनी खोक्या भाईच्या मुसक्या आवळल्या. काही दिवसांपूर्वी प्रयागराजमध्ये कुंभमेळा भरला होता. कुंभमेळ्यात प्रयागातील संगमावर शाही स्नान करण्यासाठी कोट्यवधी भाविक प्रयागराजमध्ये आले होते. त्याच प्रयागराजमध्ये पोलिसांनी खोक्या भाईला बेड्या ठोकल्या. प्राथमिक माहितीनुसार, सतीश भोसले उर्फ खोक्या भाई सुरुवातीला बीड जिल्ह्यातच फिरत होता. मध्यंतरी त्याने एका मराठी वृत्तवाहिनीला सविस्तरपणे मुलाखत दिली होती. खोक्या भाई प्रसारमाध्यमांना मुलाखत देतो पण पोलिसांना त्याचा ठावठिकाणा लागत नाही, यावरुन बीड पोलिसांची कार्यक्षमता आणि विश्वासर्हेतवर प्रश्न उपस्थित झाले होते. त्यानंतर सतीश भोसले याच्या तपासाला वेग आला होता. महाराष्ट्रात आपल्याला असलेला

धोका वाढला आहे, आपण पकडले जाऊ शकते, हे खोक्याच्या लक्षात आले. त्यामुळे खोक्याने बस पकडून तातडीने प्रयागराज गाठले. इतक्या दूर आपल्याला कोणीही पकडणार नाही, याची खोक्या भाईला खात्री असावी. तो प्रयागराजमधूनही निघण्याच्या तयारीत होता. त्यावेळी पोलिसांनी प्रयागराज विमानतळावर सतीश भोसले याला अटक केली. खोक्या भाई गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. बीड पोलिसांनी त्याला शोधण्यासाठी दोन पथके तैनात केली होती. मात्र, दिवसरात्र मेहनत घेऊनही खोक्या भाई पोलिसांना सापडत नव्हता. अखेर खोक्या वापरत असलेल्या मोबाईल फोनचे लोकेशन पोलिसांना मिळाले आणि तो अडकला. खोक्या भाईला पोलिसांनी पकडले

पक्षश्रेष्ठींनी सुरेश धस यांना समज द्यावी

पक्षाच्या भूमिकांना ठेच पोहोचू नये म्हणून आत्तापर्यंत गप्प होते-मंत्री पंकजा मुंडे

मुंबई । प्रतिनिधी आमदार सुरेश धस गेल्या काही दिवसांपासून मंत्री पंकजा मुंडे यांच्यावर जाहिरपणे टिका करताना दिसत आहेत. यासोबतच त्यांनी थेट काही आरोपही केली आहेत. विधानसभा निवडणुकीमध्ये आष्टीत पंकजा मुंडे यांनी पक्षाचे काम केले नसून अपक्ष उमेदवाराचे काम केल्याचा आरोप हा सुरेश धसांकडून सातत्याने केला जातो. हेच नाही तर पक्षाचे काम न केल्याने त्यांच्यावर कारवाई व्हावी, असेही बोलताना मध्यंतरी धस दिसले होते. बीडच्या प्रश्नावर विचारले असता पंकजा मुंडे यांनी मला ते विचारू नका म्हटले होते. यावरही सुरेश धस यांनी टीका केली होती. आता पंकजा मुंडे या सुरेश धस यांच्याबद्दल बोलताना दिसल्या आहेत. पंकज मुंडे यांनी सुरेश धस यांना पक्षश्रेष्ठींनी समज द्यावा, असे म्हटले आहे. मी भाजपाची राष्ट्रीय नेता असूनही धस थेट आरोप कसे करतात? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरेश धस यांना समज द्यावी असे म्हटले. संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या एसआयटी चौकशीची मागणी मी पहिल्यांदा केली, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. विषय कोणताही असो सुरेश धस पंकजा मुंडेंवर टीका करताना दिसतात. मात्र, पंकजा मुंडे या सुरेश धसांबद्दल बोलणे टाळतात. आता पक्षश्रेष्ठींनीच सुरेश धसांना समज द्यावी असे त्यांनी म्हटले. सुरेश धस हे विधानसभा निवडणुकाचा निकाल लागल्यापासून सातत्याने पंकजा यांना टार्गेट करताना दिसतात. संतोष देशमुख हत्या प्रकरणामध्येही त्यांनी पंकजा मुंडेंवर टीका केली. पुण्यात बीडबद्दल विचारले असता त्यांनी बोलणे टाळले होते. यावर सुरेश धस हे म्हणाले होते की, पंकजा मुंडे या राज्याच्या मंत्री आहेत. मुळात म्हणजे त्यांना बीडमध्ये अजिबात रस राहिला नाहीये आणि बीड राज्याच्या बाहेर येते. त्यामुळेच त्या यावर बोलणे टाळतात. पंकजा मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये केजमध्येच फक्त पक्षाचे काम केले, असाही आरोप त्यांनी लावला. विकास कामांच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात सुरेश धस आणि पंकजा मुंडे हे एकाच मंचावर आले होते, त्यावेळी दोघांनीही जोरदार टोलेबाजी केली होती.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १३ मार्च २०२५
https://lokaarambh.com

संपादकीय

महाराष्ट्राचा आरसा विधानसभेत सादर

महाराष्ट्राचा हा आरसा गेल्या सप्ताहात विधानसभेत सादर केला गेला. सर्वसाधारणपणे आरशासमोर जाणाऱ्यास आपले ध्यान कसे आहे याची कल्पना असते. म्हणजे प्रत्यक्षात बेंगरूळ असलेल्यास आरसा त्याचे रूप राजबिंडे दाखवतो असे होत नाही. अर्थात तरीही स्वत:स तसे मानण्याचा अधिकार प्रत्येकास असतो हे मान्य. पण स्वत:ने स्वत:स कितीही राजहंस मानले तरी इतरांनीही ते मान्य करावे असा आग्रह धरता येत नाही. सबब या आर्थिक पाहणी अहवालाच्या आरशात महाराष्ट्राने स्वत:चे रूप एकदा पाहून घेणे इष्ट. ज्यासाठी हे राज्य ओळखले जात होते त्या कारखानदारीची वाढ खुरटलेली, मु ंबईच्या जिवावर उड्या मारणारे सेवा क्षेत्र बसकण मारून बसलेले, लाडक्या बहिणींच्या ओवाळणीचे कोण कौतुक; पण त्यामुळे या बहिणींच्या एकंदर कल्याणासाठी आवश्यक खर्चात हात आखडता घेण्याची आलेली वेळ इत्यादी अनेक मुद्दे या आर्थिक पाहणीच्या आरशातून समोर येतात. ते पाहायचेच नसेल तर गोष्ट वेगळी. पण कितीही दिव्यांग वगैरे शब्दप्रयोग केले तरी ही आर्थिक व्यंगे लपून राहणारी नाहीत. आज (१० मार्च) सादर होणारा अर्थसंकल्प या कमतरतांची किती दखल घेतो, ही आव्हाने पेलण्यासाठी काय तयारी दाखवतो आणि मुख्य म्हणजे राज्याच्या आर्थिक वास्तवाचे गांभीर्य मान्य करण्याचा प्रामाणिकपणा तो दाखवतो का, हे दिसेलच आणि त्याची रास्त चिकित्साही होईल. तूर्त ताज्या आर्थिक पाहणी अहवालाविषयी. महाराष्ट्राचा मोठेपणा होता तो देशाच्या सरासरी आर्थिक गतीपेक्षाही अधिक वेग राखणारे राज्य असा. म्हणजे देशाची अर्थव्यवस्था सात-आठ टक्क्यांनी वाढत असली तरीही राज्य आठ नऊ टक्क्यांचा वेग राखत असे. प्रसंगी ही तफावत दोन टक्केही राहिलेली आहे. आताही ही गती देशाच्या अर्थगतीपेक्षाही अधिक आहे हे खरे. पण ही तफावत जेमतेम एक टक्क्यापेक्षाही कमी झालेली आहे. या आर्थिक पाहणी अहवालानुसार महाराष्ट्र ७.३ टक्के इतकी अर्थगती राखेल असे दिसते. या काळात देशाचा आर्थिक विकासाचा दर ६.५ टक्क्यांवर असेल. गतसाली महाराष्ट्राने आठ टक्के इतक्या गतीने विकास साधला. तो दर आता ७.३ टक्क्यांवर येत असताना देशाची गतीही कमी झाली. तार्किकदृष्ट्या देशाची गती मंदावत असेल तर महाराष्ट्रही मंदावणार हे उघड आहे. पण या मंदगतीतही महाराष्ट्राचा वेग देशापेक्षा लक्षणीयरीत्या अधिक राहात असे. आता हा वेगातील फरक कमी होताना दिसतो. आपण देशापेक्षा अधिक गतीने विकसत आहोत यात समाधान मानता येईलही पण हे दोन अनुत्तीर्णांत अधिक गुण कोणांस याची चर्चा करण्यासारखे ठरेल. समाधानच मानायचे तर ते कशातही मानता येते. आणि तसे मानणाऱ्यांचे प्रमाण कमी नाही. असो. परंतु समग्र भारतवर्षाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट, जीडीपी) महाराष्ट्राचा वाटा १३.५ टक्के इतका असतो. ही बाब लक्षात घेतली तर महाराष्ट्राचे मंदावणे देशास कितीला पडेल, याचा विचार यानिमित्ताने करणे अयोग्य ठरणार नाही. दुसरा मुद्दा मंदावत्या सेवा क्षेत्राचा. अलीकडे या क्षेत्राचा उदोउदो करण्याचे खूळ मोठ्या प्रमाणावर बोकाळलेले आहे. ङ्गिग वर्कर्सफ वगैरेंचे स्तोम हे याचेच लक्षण. हातास काहीच काम नसण्यापेक्षा ङ्गिग वर्करफ असणे तरी बरे; हे खरे. पण ही अशी हलकी सलकी कामे माणूस आयुष्यभर करू शकत नाही. हे ङ्गिग वर्कर्सफ सेवा क्षेत्रातील. हे क्षेत्रही जणू भारताचे तारणहार असे मानण्याचा प्रघात अलीकडे दिसतो. पण हा आर्थिक पाहणी अहवाल या क्षेत्राचे वास्तव समोर मांडतो. त्यात राज्याची सर्वच सेवा क्षेत्रातील घसरण ठसठशीतपणे दिसते. कारखानदारीशी निगडित, बांधकाम, वीज-पाणीपुरवठा आदी, हॉटेले, वित्तसेवा अशा सर्वच सेवा क्षेत्राने महाराष्ट्रात मान टाकलेली दिसते. या क्षेत्राची गती ८.३ टक्क्यांवरून ७.८ टक्क्यांवर उतरली. भले ही घसरण अर्धा टक्क्याची असेल. पण कारखानदारी आणि सेवा क्षेत्र असे उभयतांनी एकाच वेळी घसरणे म्हणजे दुचाकीची दोन्ही वाहने एकाच वेळी पंक्चर होण्यासारखे. यात विरोधाभास असा की थेट परकीय गु ंतवणुकीत राज्य आघाडीवर; पण औद्योगिक विकास मात्र मंदावता! देशातील एकूण थेट परकीय गु ंतवणुकीतील तब्बल ३१ टक्के इतका वाटा २०१९ ते २०२४ या काळात एकट्या महाराष्ट्रात आला. यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे राज्य कमालीची राजकीय अस्थिरता अनुभवत असतानाही येथील गु ंतवणूक ओघ आटला नाही. पण कारखानदारीच्या विकासाचा वेग मात्र ५.६ टक्क्यांवरून ४.९ टक्क्यांवर घसरला. म्हणजे ही गु ंतवणूक आली कोणत्या क्षेत्रात आणि तिचे पुढे काय झाले, हे प्रश्न. त्याचे एक उत्तर बरीच गु ंतवणूक वित्तीय क्षेत्रात आली, असे असू शकेल. पुढील काळात ती उद्योग, कारखानदारीत यावी यासाठी ठोस प्रयत्न लागतील. तिसरा मुद्दा लाडक्या बहिणींचा. त्यांना निवडणुकीच्या निमित्ताने जनतेच्या पैशावर भाऊबीजेचे रतीब घातले गेले असले तरी महिला आणि बालकल्याणावरील एकूण तरतुदींत मात्र त्यामुळे कपातीची वेळ सरकारवर येणार असे दिसते. महिलांच्या विशेष वसतिगृहांच्या तरतुदीत घसघशीत ३५ टक्के इतकी कपात झाली असून विविध ठिकाणच्या महिला समुपदेशकांवरील खर्चात तर ६९ टक्के इतकी घट झाल्याचे पाहणी अहवाल सांगतो. हे म्हणजे आपल्या

अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते

होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या

भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.-

,-जगन घाणेकर,- मु ंबई

दररोज एक नवा व्हिडिओ समोर

धनंजय देशमुखांच्या साडूचा मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल!

धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यापासून बीड जिल्ह्यातील राजकीय पुढाऱ्यांच्या कार्यकर्ते, नातेवाईक यांचे मारहाण करतानाचे व्हिडिओ समोर येत आहेत. आज मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्या साडूचा व्हिडिओ समोर आला. त्यांच्यासह चार ते पाच जण एका व्यक्तीला मारहाण करीत असल्याचे दिसून येत आहे. संतोष देशमुख खून प्रकरणामध्ये जे लोक आरोपी आहेत, ते धनंजय मु ंडे यांच्या जवळचे आहेत, त्यामुळे मु ंडेंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. राजीनामा झाल्यानंतर सुरेश धस, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर यांच्याशी संबंधित व्हिडीओ व्हायरल होत आहेत. त्यातच आणखी एक व्हिडीओ समोर आलेला आहे. मयत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांचा

साडू दादा खिंडकर याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यामध्ये दादा खिंडकर याच्यासह पाच ते सहा जण एका तरुणाला बेदम मारहाण करीत आहेत. मारहाण करण्यामध्ये एक पोलीस असल्याचा संशय आहे. कारण त्यातला एक तरुण म्हणतोय, तुम्ही पोलीस आहात तळपायावर मारा. वर्षभरापूर्वीचा हा व्हिडीओ असल्याची माहिती आहे. यावर प्रतिक्रिया देताना धनंजय देशमुख म्हणाले की, कायदा हा सर्वांसाठीच सारखा आहे. या प्रकरणाचं स्पष्टीकरण हे दादा खिंडकर यांच्याकडूनच घेतलं पाहिजे. मात्र हे जुने व्हिडीओ नेमकं कोण व्हायरल करतंय, असा प्रश्न निर्माण होतोय. बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस पावलं उचलणार का? असा प्रश्न उपस्थित होतोय.

माजलगाव शहरासह तालुक्यातील मटका बंद करा

माजलगाव पत्रकारांची पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी -

माजलगाव (प्रतिनिधी) बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचे बीड जिल्ह्यात आगमन होताच गुटखा, वाळू माफिया, गुंड यांचे धाबे दणाणले गुटखा बंद झाला वाळूची अवैध तस्करी बंद झाली आणि गुंड लपून बसले मात्र माजलगाव तालुक्यातील मटका आजही चालूच आहेत या अवैध मटक्याच्या जुगारा मुळे अनेक गोरगरीब मजूर यांचे संसार उध्वस्त होत आहेत हे पाहून म ाजलगाव शहरासह तालुक्यातील मटका बंद करावा अशी मागणी माजलगाव पत्रकारांच्या वतीने पोलीस अधीक्षक कावत यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे .

बीड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसापासून अवैध धंदे वाढले होते गुंडगिरी वाढली होती या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी तरुण तडफदार पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना महाराष्ट्र सरकारने नियुक्त केले त्यांनीही आपली धडाडीची कारकीर्द दाखवत बीड जिल्ह्यातील गुटका किंग, वाळू किंग, तसेच गुडांचे आका यांच्यावर जरब निर्माण केली यामुळे कावतांची दहशत कुठेतरी फावत आहे याचे दर्शन बीड जिल्ह्याला झाले मात्र मटका जुगार राजरोसपणे माजलगाव शहरासह ग्रामीण भागात चालू आहे आपण एक रुपया लावला तर नव्वद रुपये मिळणार

या आशेने मजुरी काम करणारे महिला पुरुष यामध्ये भरडले जात आहेत मटका तर लागतच नाही मात्र अशा खूप वाईट असते आज ना उद्या आपल्याला मटका लागेल या हेतूने रोजंदारी करणारे मजूर आपण दिवसभर केलेल्या कामाचे पूर्ण पैसे मटक्यावर लावत आहेत आणि दुस-्या दिवशी मटका न लागल्यामुळे गृहकलह करून संपूर्ण कुटुंब उपाशी झोपत आहे कावत साहेब मजुरीचे पैसे आम्हाला पुरतात मात्र माजलगाव तालुक्यातील मटका बंद व्हायला हवा अशी आरत हाक मजूर कुटुंबीयांच्या म हिला पोलिसांसह, पत्रकारांना देत आहेत ही हाक ऐकून माजलगाव पत्रकारांच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत कावत ज्यांच्याकडे निवेदन देऊन माजलगाव शहरास ग्रामीण तालुक्यातील मटका बंद करावा अशी मागणी करण्यात आली आहे याचे प्रतिलिपी निवेदन माजलगाव पोलीस ठाणे शहर, माजलगाव पोलीस ठाणे ग्रामीण यांना देण्यात आलेले आहे यावर तात्काळ कारवाई न झाल्यास तालुक्यातील जनतेच्या वतीने जनतेसह पत्रकार तीव्र आंदोलन करतील याची दक्षता पोलीस प्रशासनाने घ्यावी असा इशाराही देण्यात आलेला आहे .

परळी औष्णिक विद्युत केंद्रात महिला दिन उत्साहात

परळी : वीज निर्मितीत महिलांचा सक्षम सहभाग असल्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांनी केले. ते परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासकीय इमारतीत जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.शक्तीकु ंज येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस सुरुवातीला बंधन पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. या कार्यक्रमात महिलांच्या कतृ ‍त्वाचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनिल इंगळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, चार्टर्ड अकाउंटंट संकेत मंत्री, अनिता इंगळे, अनिता महाजन आणि मनीषा अवचार उपस्थित होते. विचारपीठावर उपमुख्य अभियंता

महेश महाजन, प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे, सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड आणि सुरक्षा अधिकारी बी. के. कुलकर्णी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना मुख्य अभियंता सुनिल इंगळे म्हणाले की, आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या वीज निर्मितीमध्येही महिलांचा मोलाचा वाटा आहे. येथील अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटी महिलांचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे. पोलिस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी महिलांनी कायद्याचे ज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. महिलांनी स्वतःला कधीही कमी लेखू नये आणि नेहमी सतर्क राहावे, असेही ते म्हणाले. चाट ‍ड ‍ अकाउंटंट संकेत मंत्री यांनी महिलांचे नियोजन कौशल्य उत्कृष्ट असल्याचे सांगितले. त्यांनी महिलांना भविष्याची गरज लक्षात घेऊन बचत करण्याचे महत्त्व समजावून सांगितले. या कार्यक्रमात अभियंता हिमानी होटकर आणि आरपी विभागातील सर्वो त्कृष्ट कर्मचारी स्वाती लहाने यांचा मुख्य अभियंत्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बीएम विभागातील स्वच्छता कर्मचारी हाजू खाला यांनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्योती रांदड यांनी केले, सूत्रसंचालन के. एच. गित्ते यांनी केले आणि आभार माधुरी घुगे यांनी मानले.

तुलसी महाविद्यालयात सावित्रीमाई फुले स्मृति दिनानिमित्त अभिवादन

बिडकीन - श्री जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी ३७५ वा वैकुंठ गमन सोहळा आणि राज्यस्तरीय अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आमदार विलास संदीपान भुमरे प्रतिष्ठान व डॉ. शिंदे धन्वंतरी मेडिकल फाउंडेशन यांच्या वतीने आठ दिवसांचे मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.शिबिराच्या पहिल्या दिवशी या उपक्रमाचे उद्घाटन ह. भ. प. एकनाथ महाराज जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बिडकीन ग्रामपंचायतीचे सरपंच अशोक धर्मे, युवा सेना जिल्हा प्रमुख काकासाहेब पाटील टेके, शिवसेना तालुकाप्रमुख मनोज पेरे, ग्रामपंचायत सदस्य मधुकर सोकटकर, किरण गुजर, बबन ठाणगे तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसादपहिल्याच दिवशी एकूण २२८ रुग्णांनी मोफत आरोग्य तपासणी करून घेतली. यामध्ये उच्च रक्तदाब, म धुमेह, हृदयरोग आणि इतर आजारांच्या तपासण्या करण्यात आल्या तसेच आवश्यक असलेल्या रुग्णांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले.

या शिबिरात डॉ. दिपक गायकवाड, डॉ. त्रिबक पाडळकर, डॉ. संतोष शेळके (अल्पाईन हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर), डॉ. असलम शेख आणि त्यांच्या नर्सिंग टीमने सेवा दिली. भाग्यश्री गवंदे, दीपाली निकाळजे, हेमंत जाधव आदी वैद्यकीय कर्मचारी देखील कार्यरत होते.पोलीस बंदोबस्त आणि नियोजन शिबिराच्या दरम्यान सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बिडकीन पोलीस स्टेशनच्या वतीने रेणुका बोंबले, शीतल जाधव, काजल चव्हाण, सुरेखा राठोड यांनी विशेष देखरेख ठेवली.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १३ मार्च २०२५
https://lokaarambh.com

तेलगाव बस स्थानकात प्रवाशी महिलेचे मंगळसूत्र लुटले

किल्ले धारूर दि.१२ (प्रतिनिधी) तेलगाव बस स्थानकामध्ये बसमध्ये चढत असताना प्रवाशी महिलेचे मंगळसूत्र वरबाडून चोरट्याने पळ काढला.त्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बीड जिल्ह्यात तेलगाव बस स्थानक हे मध्यवर्ती बस स्थानक असून, परळी ,माजलगाव, वडवणी व धारूर या चार तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे.या बस स्थानकात लांब पल्ल्याच्या बसची वाहतूक होत असते.त्यामुळे प्रवाशांची सतत मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.मात्र एवढी वर्दळ असतानाही या ठिकाणी एकही पोलीस कर्मचारी कधीही दिसून येत नाही.काल माजलगाव- चिपळूण बस मध्ये चढण्यासाठी प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती.या गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र वरबाडून पसार झाल्याची घटना घडली.महिला बस मध्ये गेल्यानंतर तिच्या लक्षात आले. त्यावेळेस त्या महिलेने आरडा ओरडा केल्याने बस काही वेळ थांबण्यात आली. मात्र चोरट्याचा कांही पत्ता लागला नाही. अशा सतत घटना तेलगाव बसस्थानकात होत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावर निर्माण झाले आहे.

आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्रासह परराज्यातील कृषी संशोधन केंद्र, ऐतिहासिक स्थळांना दिल्या भेटी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत व आदित्य शिक्षण संस्था बीड संचलित आदित्य कृषी महाविद्यालय बीड येथील बी. एस्सी. कृषी पदवीच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचा राज्यस्तरीय शैक्षणिक सहलीचा अभ्यास दौरा संपन्न झाला. या दरम्यान विद्यार्थ्यांनी राज्यातील राष्ट्रीय पातळीवरील नामांकित कृषी संशोधन केंद्र, संशोधन संस्था याबरोबरच ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. विद्यार्थ्यांनी तेथील शैक्षणिक माहिती संकलित केली. या ६ दिवसाच्या सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते. सदरील सहलीचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम भुतडा यांच्या नियोजनाखाली पाचव्या अधिष्ठाता समन्वय समितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वृद्धिंगत करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना शक्तीला पुरेशी संधी उपलब्ध करून देणे आणि पदवी शिक्षणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व उद्योजकीय विकास रुजवणे अशा उदात्त हेतुने या शैक्षणिक सहलीचे आयोजन २४ फेब्रुवारी १ मार्च २०२५ दरम्यान करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या शैक्षणिक सहलीच्या प्रथम चरणामध्ये राज्यातील कृषी संशोधन संस्था, कृषी विज्ञान पान १ वरून केंद्र, राष्ट्रीय स्तरावरील नामांकित कृषी व कृषी संलग्नित क्षेत्रामध्ये कार्यरत कंपन्या ना भेट देऊन माहिती घेतली. तसेच ऐतिहासिक महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा किल्ला, विविध सागरी किनारे, कृषी महाविद्यालये ई. ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती संपादित केली. सदरील शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून सहलीत सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनींना कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उद्यमशीलता, उद्योग व्यवसाय, हंगामानुसार पीक उत्पादन, उपलब्ध बाजारपेठा इत्यादी विविध कृषि क्षेत्रातील तांत्रिक मार्गदर्शन व माहिती प्राप्त करून घेतली. या सहलीच्या नियोजन व आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम भुतडा, डॉ. हिमांशू श्रीवास्तव, प्रा.बालाजी बहिरवाल, डॉ. पी डी खेडकर, प्रा. व्ही बी शिंदे, प्रा. के एस पवार, प्रा. माया शिंदे, प्रा. गव्हाणे, प्रा. पवार, राऊत, अशोक पवार यांनी परिश्रम घेतले.

गरजू लोकांना कीचनं किट वाटप व मार्गदर्शन शिबीर

बीड शहरातील ताज फंकशन हाल येथे आज दिनांक १० मार्च सोमवारी गरजू लोकांना किचन किट वाटप व विविध योजनाचे मार्गदर्शन शिबीर मा. शेख निजाम यांचे अध्यक्षते खाली वा एम आय एम चे जिल्हा अध्यक्ष शेख शफ्कि भाऊ,समाज सेवक मुसा खान,मौलाना आझाद मंडळ चे जिल्हा व्यवस्थापक इमरान कादरी सर, नगरसेवक सादेख भाई, सलाम सेट, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजक श्री राजू भाई आणि जुबेर खान होते. या कर्यक्रमात ५०० कामगार लोकांना किचन सेट वाटप करण्यात आले. तसेच संजय गांधी व श्रवान बाळ योजना चे २०० प्रस्ताव तयार करण्यात आले. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळं अंतर्गत येणाऱ्या योजना ची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात शेख निजाम भाई यांनी लाभार्थीयांना मार्गदर्शन केले.तसेच शफिक भाऊ आणि मुसा खान साहब यांनी राजू भाई व जुबेर खान चे सामाजिक कार्याचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिली.

यशवंती आधार सामाजिक संस्थेच्या वतीने खरात आडगाव येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे भूमिपूजन

पाटोदा प्रतिनिधी: - स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील शेकडो गरीब विद्यार्थ्यांना मिळणार मोफत लाभ - राजेश दिवटे यशवंती आधार सामाजिक संस्था पुणे संचलित स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा भूमीपूजन सोहळा आज खरात आडगाव तालुका माजलगाव येथे संपन्न झाला या भूमीपूजन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड.सुभाष राऊत तसेच या कार्यक्रमाचे भूमीपूजन मा.रखमाजी कंबळे माझी सरपंच मुक्ताबाई कंबळे, यांच्या हस्ते झाले तसेच प्रमुख पाहुणे माजी सभापती जिल्हा परिषद मा.कल्याण आबुज, गोसेवक संतोष सुरवसे, उपसरपंच, स्वप्निल शेजुळ सरपंच ॲड.राज पाटील, पत्रकार दताञ्य प्रभाळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मा.जे. बी. पांचाळ सर, पत्रकार संतोष रासवे, ज्ञानेश्वर कोरडे, जगन्नाथ खेजे, आदर्श पत्रकार अंकूश गवळी उपसरपंच भागवत गायके पद्मकर कंबके उपस्थित होते

संयोजक यशवंती आधार सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.राजेश बाबासाहेब दिवटे, सौ.राधा दिवटे आदि मान्यवर उपस्थित होते या वेळी संस्थेचे संचालक राजेश दिवटे या सामाजिक प्रकल्पाविषयी म्हणाले की या ग्रामीण भागातील अनाथ,दिव्यांग, ऊसतोड कामगारांचे,तसेच परिस्थिती अभावी गरीब असणारे विद्यार्थी सर्व

विद्यार्थ्यांना या स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून मोफत मध्ये भव्य ग्रंथालय भव्य अभ्यासिका तसेच तज्ञांचे मार्गदर्शन केले जाणार आहे. या स्पर्धा परीक्षा केंद्राचा या भागातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे. या वेळी मा. कल्याण भाऊ आबुज, मा.सुभाष भाऊ राऊत, मा.राज पाटील, जे बी पांचाळ इत्यादी पाहुण्यांनी संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या तसेच प्रेरणादायी वक्ते समाजिक कार्यकर्ते राजेश दिवटे यांच्या कार्याचे कौतुक केले.

आष्टी पंचायत समिती आमसभेसाठी संबधितानी उपस्थित राहावे

बीड, दि, 12 :- पंचायत समिती आष्टी,पाटोदा,शिरूर कासारची आमसभा पंचायत समिती पाटोदाच्या प्रांगणात दि. 16 मार्च 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता आमदार सुरेश रामचंद्र धस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. आमसभेकरीता आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, सहकारी संस्थेचे पदाधिकार, ग्राम पंचायत अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, मुख्याध्यापक यांनी उपस्थित राहवे, असे आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

विकास कामासाठी मी प्रयत्नशील असेल : सरपंच केशव आप्पाराव आंधळे

वडवणी । प्रतिनिधी ग्रामीण भागात अनेक विकास कामे करणे आवश्यक आहे . अजूनही ग्रामीण भागात चांगल्या सुविधा मिळू शकत नाहीत येणाऱ्या काळात आपल्याला आवश्यक ती विकासकामे करायची असून त्यासाठी सर्वांना सोबत घेऊन अनेक काम करण्याचा प्रयत्न करणार आहे . असे व्यक्त मत पिंपळा रुई येथील कार्यसम्राट सरपंच केशव आप्पाराव आंधळे सर केले आहे सरपंच केशव आप्पाराव आंधळे यांच्या सरपंच या माध्यमातून पिंपळा रुई येथे या पूर्वी विविध कामांचा जोर चांगलाच धरलेला आहे आणि या पुढे देखील विकास कामांसाठी निधी खेचून आण्यासाठी मी प्रयत्नशील राहील. गहिनीनाथ नगर येथे दि.११ मंगळवार रोजी सिमेंट रस्ता या

कामच्या उद्घाटन प्रसंगी यावेळी उपस्थित धंनजय बाबासाहेब आंधळे , उपसरपंच रावसाहेब महाराज आंधळे, माझी सरपंच बडू गवळी, पिटू सर आंधळे, ग्रामपंचायत शिपाई शहादेव मु ंडे, रोजगार सेवक बाळू आंधळे,विजू शेख,राजेभाऊ आंधळे , चंद्रकांत भांगे ,सुभाष भांगे, गणी भाई शेख , बळीराम आंधळे मुकादम, या वेळी अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

कृषी केंद्र चालकाची बॅग चोरी व्यापाऱ्यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड दि.12 (प्रतिनिधी): शहरातील जुना मोंढा येथील बळीराजा ॲग्रो एजन्सीचे मालक अण्णाभाऊ साठे चौकात कामासाठी थांबले होते. त्यांच्या कार मध्ये ठेवलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून या विरुद्ध कारवाई करण्याचे निवेदन व्यापाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांना दिले आहे.

जुना मोंढा येथील बळीराजा ॲग्रो एजन्सीचे केदारनाथ शहीर हे शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात (दि.1) मार्च रोजी रात्री कामासाठी गाडी बाजूला लावून थांबले असता त्यांच्या कार मध्ये 3 लाख रुपये असलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. अशा प्रकारे होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे अशा चोरट्यांचा पोलिसांनी बंदोबस्त करावा तसेच केदारनाथ शहीर यांचो चोरी केली रक्कम याचा तपास करावा या मागणीचे निवेदन बीड पोलीस अधीक्षकांना व्यापाऱ्यांच्या वतीने देण्यात आले आहे.

डॉ अशोक थोरात यांच्या १४ मार्च रोजी येणाऱ्या वाढदिवसानिमित्त कथेच्या ठिकाणी बोलावून २५ साड्या सुपूर्द केल्या व त्यांचे अभिष्टचिंतन केले.

श्याम विद्यालयाचे शिक्षक श्री दत्ता ठोंबरे यांच्या वास्तुशांती कार्यक्रमा निमित्ताने प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देताना दीप हॉस्पिटल बीड चे संचालक, वडमाऊली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भाजपचे कार्यकर्ते डॉक्टर शशिकांत शामराव दहिफळकर, कार्यक्षम सरपंच डॉक्टर अनिता शशिकांत गदळे व डोईफवाडी चे माजी सरपंच तात्यासाहेब डोईफोडे आणि इतर

वयोवृद्ध आजबे दांमपत्याची फरफट; पुढारी नातवानेच केली फसवणूक ; गोड बोलून जमिन विकली परतु पैसे देण्यास टाळाटाळ

बेलगाव:- (दि.12) दोन्ही मुले वारली. वयोवृद्ध आजबे दाम्पत्याच्या जमिनीची गाव पुढारी असणाऱ्या नातवाने (मुलीच्या मुलाने) गोड बोलून विक्री करून आलेला पैसा स्वतःच्या खात्यावर जमा केला. आजोबांनी वारंवार नातवाला पैशाची मागणी करूनही गाव पुढारी नातवाने आज देतो, उद्या देतो म्हणत 2 वर्षांपासून टाळाटाळ करत आहे. मुलीच्या मुलांकडे जमिन विकुन पैसे दिल्याने मुलाचा मुलगाही सांभाळ करत नाही. त्यामुळे वयोवृद्ध आजबे दांमपत्य अत्यंत हलाखीच्या परीस्थीतुन जात असुन या वयात काही करता येत नाही,पोट भरायचे कसं?? असा प्रश्न पडला असुन आमची अडचण सोडवा अशी कैफियत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना मांडली. सिताराम संभाजी आजबे वय 90 वर्षे मुळचे राहणार ब्रम्हगाव ता.आष्टी जि.बीड. त्यांना 2 मुले आणि 4 मुली. त्यांची त्याठिकाणी साडे 3 एक्कर जमिन होती. जमिनीच्या भांडणात भावकीच्या माणसांनी मोठा मुलगा ज्ञानेश्वर याचा खुन केला. दुसरा मुलगा उत्तम भावकीच्या भितीने आजोळी टाकळगव्हाण ता.गेवराई याठिकाणी राहु लागला.6 वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले. त्यांना 4 मुली असुन दोन मुली बीड तालुक्यातील बेलगाव आणि सोमनाथ वाडी या ठिकाणी तर दोन मुली पाटोदा तालुक्यातील मंगेवाडी आणि डोमरी (रोहतवाडी) याठिकाणी दिलेल्या आहेत. 4 वर्षांपूर्वी सोमनाथवाडी येथील गाव पुढारी नातवाने गोड बोलून माझी साडे

आम्हाला आता काम होत नाही आम्ही जगायचं कसं??

3 एक्कर जमिन विकायला लावली. जमिन विकुन आलेले 20 लाख रुपये स्वतःच्या खात्यावर टाकले. नंतर आम्ही पैसे मागितल्यावर आज देतो.उद्या देतो म्हणून टाळाटाळ केली. 2 वर्षांपूर्वी टाकळगव्हाण येथील मुलाने आग्रह धरल्याने 6 लाख रुपये दिले. त्याचं नातवाने ट्रॅक्टर घेतले. लाख रुपये मध्यंतरी दवाखान्यासाठी दिले. मात्र 2 वर्षांपासून उर्वरित 12 लाख रुपये द्यायला टाळाटाळ करत आहे. मला चालता येत नाही. टाकळगव्हाण येथुन 3000 रुपये गाडी भाडे करून. सोमनाथवाडीला यावं लागतं. अशा 10 -12 वेळा चकरा मारल्या आहेत. दोघांच्या नावाने दिलेले प्रत्येकी 5 लाख रुपयांचे चेक आहेत.पण बँक वाले म्हणतात खात्यात पैसेच नाहीत.द्यायचे कुठुन??

मुलीच्या मुलांकडे जमीन विकुन पैसे दिल्याने मुलाचा मुलगा आम्हाला सांभाळीत नाही. आम्हाला काम होत नाही, आम्ही जगायचं कसं ?? असा उद्विग्न सवाल सिताराम संभाजी आजबे यांनी करत आहेत.

कै. गणपतराव गुट्टे प्राथमिक विद्यालय आणि श्री वैधनाथ आय टी आय मध्ये आरोग्य शिबीर संपन्न

शाळेतील व आय टी आय.कॉलेज च्या विद्यार्थ्यांची तपासणी झाली

परळी : याबाबत सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील हाळम येथे संस्थेचे अध्यक्ष मा. माधव मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली,कै. गणपतराव गुट्टे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि श्री वैधनाथ आय टी आय मध्ये आरोग्य शिबीर संपन्न झाला..या वेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली .या वेळी डॉ.म्हणून धर्मापुरी आरोग्य विभाग चे तज्ञ म्हणून डॉ.घोबाळे सर व आरोग्य सेवक म्हणून बालाजी शिंदे सर यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील व आय टी आय.कॉलेज च्या विद्यार्थ्यांची तपासणी झाली होती. या मध्ये विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती देत औषध उपचार करण्यात आले होते. शिबिरप्रसंगी शिबिर अध्यक्ष म्हणून माधव मु ंडे सर,माणिकराव दहिफळे,सुधाकर गित्ते, विष्णू दहिफळे ,सर्वश्री ज्ञानेश्वरी फड मॅडम,आय टी आय चे प्रिंसीपल सोमेश मुंडे सर ,के. जी.जी स्कुल चे प्रिंसीपल नवल वर्मा सर ,गोविंद दहिफळे सर या वेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम सुत्रसंचलन संध्या चव्हाण

मॅडम आणि केले व आलेल्या पाहुण्यांचे आभार सर्व स्टाफ ने मानत शिबीर संपन्न केला.शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ज्ञानेश्वरी फड मॅडम सोमेश मु ंडे सर,नवलकुमार वर्मा सर,,संध्या चव्हाण मॅडम, प्रदीप पिंपळे सर,गोविंद दहिफळे सर,सुजित हाके सर ,करुणा वाघमारे मॅडम,राहुल पंडित सर, आरती फड मॅडम,वैष्णवी दहिफळे मॅडम,सुमन सरवदे मॅडम,स्वप्नाली आव्हाड मॅडम,श्रीकृष्ण मुंडे सर, नागनाथ कातकडे सर,अमोल कातकडे सर, प्रतीक्षा मेंगले मॅडम,अक्षता मुंडे मॅडम, वसंत होळंबे , हरिचंद्र मु ंडे.शोभा मु ंडे ,सोनाली मुसळे,सोमेश्वर गुट्टे ,,लहू गुट्टे ,बाबुराव केंद्रे.

मंडळ निरीक्षक शितल चाटे यांना राज्यस्तरीय रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून सन्मानित

बीड :बीड तालुक्यातील पाली महसूल विभागाच्या कर्तव्यदक्ष मंडळ निरीक्षक, शितल चाटे यांना महाराष्ट्र राज्य रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. हा सन्मान अविनाश पाठक बीडचे जिल्हाधिकारी , शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी, कविता जाधव उपविभागीय अधिकारी आणि चंद्रकांत शेळके तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली त्या पाली मंडळा खूप चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्याची निवड करण्यात आली होती. त्यानिमित्त शितल चाटे याना सन्मानित करण्यात आले आहे. शितल चाटे यांनी आपल्या कार्यकाळात बीड जिल्ह्यातील पाली महसूल विभागामध्ये, त्यांच्या कर्तव्यावर अगदी प्रामाणिकपणे कार्यरत राहून जनतेच्या अडचणींच्या निराकरणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १३ मार्च २०२५
https://lokaarambh.com

होळी आणि धुलीवंदनात रंगाचा बेरंग होऊ नये यासाठी कडकोट बंदोबस्त, शहराला येणार छावणीचे स्वरुप

रंगपंचमीला मद्याच्या नशेत गाडी चालवणाऱ्यांना रोखण्यासाठी तसेच वाहतूकीच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शहरात ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे.

होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मुंबई पोलिसांनी कडेकोड बंदोबस्त लावला आहे. मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यात रस्त्या रस्त्यावर चौकात पोलिसांच्या टीम बंदोबस्ताला जुंपण्यात आल्या आहेत. शहरातील संवेदनशील ठिकाणांवर पाळत ठेवण्यात आली असून पेट्रोलिंग सुरु करण्यात आले आहे. रंगाच्या या सणाला कोणतेही गालबोट लागू नये यासाठी पोलिसांनी महत्वाच्या ठिकाणांवर एसआरपीएफच्या तुकड्या तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई आणि उपनगरात होळी आणि रंगपंचमीच्या दिवशी रंगाचा बेरंग होऊ नये यासाठी मुंबई पोलिसांना चांगली कंबर कसली आहे. मुंबईतील संवेदनशील विभागात अधिकचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. एसटी आणि बेस्टच्या बसेसना सुरक्षा जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. तसेच लोकल ट्रेन आणि मेट्रो तसेच मोनोरेलची खास काळजी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या मुंबई आणि उपनगरात ०७ अपर पोलीस आयुक्त, १९ पोलीस उप आयुक्त,५१ सहायक पोलीस आयुक्तांची नियुक्ती करण्यात आल्या आहेत. तसेच १७६७ पोलीस अधिकारी आणि ९१४५ पोलीस अंमलदार बंदोबस्तकरीता तैनात करण्यात आले आहेत.ड्रक एण्ड

ड्राईव्ह मोहिम राबविणार

होळी आणि रंगपंचमीच्या दिवशी अनेकदा अंगावर जबदस्तीने रंग उडविल्याने वादावादीचे प्रकार घडतात. त्यामुळे वादाचे पर्यावसन कोणत्याही धार्मिक तेढीत होऊ नये याची काळजी घेण्याचे आदेश देण्यात आले होते. महत्वाच्या ठिकाणी एसआरपीएफ तुकड्या, दंगल नियंत्रण पथक, क्युआरटी टीम, बीडीडीएस टीम आणि होमगार्डसची तैनाती करण्यात आली आहे. तसेच मद्यप्राशन करुन दुचाकी आणि कार चालविणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी पथके तैनात करण्यात आले आहेत. वाहतूकीच्या नियमांचे पालन होण्यासाठी ठीक ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्यांवर, महिलांशी गैरवर्तवणूक करणाऱ्यांवर आणि अनधिकृत मद्य विक्री तसेच अंमली पदार्थांचे सेवन तसेच विक्री करणाऱ्यांवरच कारवाई करण्याचे आदेश मुंबई पोलीसांनी दिले आहेत.

सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी रित्या संपन्न

पाटोदा (प्रतिनिधी)

सी एस डॉ.अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा ग्रामीण रुग्णालयात डॉ जाधव व डॉ ओमासे यांच्या तज्ञ डॉक्टरांच्या टीमने सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी रित्या संपन्न

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्या माध्यमातून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य विभाग बीड सी एस डॉ अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा ग्रामीण रुग्णालयात प्रत्येक महिन्याच्या मंगळवारी बुधवारी सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबीराचा आयोजन करण्यात येते

सदर शिबिरात ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथील डॉक्टर अभिषेक जाधव व एम एस सर्जन,डॉक्टर शुभांगी ओमासे भूलतज्ञ यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील टीम चांगल्या प्रकारे रुग्णांची सेवा करतात श्रीमती किशोरी डोरले,नागरे प्रियंका,आसमा मुजावर, सिस्टर व कर्मचारी सानप अर्जुन,सुनील लाड, देवराव राख,पवार सोपान, इत्यादी कर्मचा-यांसह पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी रुग्णांना चांगली सेवा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करतात तसेच पाटोदा तालुक्यातील रुग्णांनी कुटुंब नियोजन, सांधे दुखी, हर्निया, अपेनडिक्स,मुतखडा,व इतर शस्त्रक्रियेसाठी बाहेर न जाता कोणत्याही महिन्यातील पहिल्या मंगळवार व बुधवारी आपल्या पाटोदा ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रिया केली जात असल्याने ग्रामीण रुग्णालयाला संपर्क साधीत जावा आशे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ अभिषेक जाधव यांनी केले आहे

विकास कामे दर्जेदार करण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे-रणवीर पंडित

गेवराई (प्रतिनिधी) लोकांनी मोठ्या विश्वासाने आपल्याला निवडून दिले आहे. विजय काका आमदार झाले आहेत, त्यामुळे आता रखडलेली विकासकामे गतीने पुर्ण होतील. होणारी कामे दर्जेदार केली जातील. आपल्या सहकार्याची गरज असून आपल्या गावात होणारी विकासकामे दर्जेदार करण्यासाठी सर्वांनी समन्वयांनी काम करण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. बोरगाव येथे विविध विकास कामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते. गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे बोरगाव नवे, बोरगाव जुने व बरड येथे नुतन ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा शुभारंभ मंगळवार दिनांक

११ मार्च रोजी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदकिशोर गोर्डे, विश्वांभर गोरडे, सुभाष गोर्डे, सरपंच एकनाथ बनसोडे, अशोकराव जाधव, अनिल जाधव, भाऊसाहेब खंदारे, शंकरराव जाधव, परमेश्वर जाधव, अशोक पाटील, वैजनाथ जाधव, विनायक जाधव, बाळु आवारे, तुकाराम जाधव, रमेश जाधव, रविंद्र जाधव, बाळु जाधव, कल्याण नलावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन शिवराज जाधव यांनी केले तर आभार ग्रामपंचायत सदस्य तुकाराम जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच एकनाथ बनसोडे, उपसरपंच राहुल जाधव, ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, संदीप जाधव, तुकाराम जाधव, ब्रह्मनाथ जाधव, बाळू जाधव यांनी परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरवार रोजी सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांचे कीर्तन

बीड-प्रतिनिधी विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील सातव्या पुण्यतिथी फाल्गुन शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. महंत गुरूवर्य सुरेशानंदजी महाराज शास्त्री श्रीक्षेत्र श्रृंगऋषी गड यांचे गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी ढेकणमोह ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय पुरस्कार गाजरे सर यांना जाहीर

माजलगाव-प्रतिनिधी ५ फेब्रुवारी रोजी झालेल्या पदाधिकारी बैठकीत अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आले. यात साने गुरुजी बालसेवा पुरस्कार २०२५ हा अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार माजलगाव येथील प्रसिद्ध शिक्षक, ज्येष्ठ नागरिक संघ, माजलगावचे सचिव श्री के. व्ही. गाजरे सर यांना जाहीर झाला. याबद्दल ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, माजलगावचे संचालक डॉ. प्रकाश खोडसकर यांच्या वतीने गाजरे सरांचा विशेष सत्कार करण्यात आला या प्रसंगी संघाचे सर्व संचालक, महिला व पुरुष सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मातृ हृदयी साने गुरुजींच्या गुरुजींच्या विचाराचा सर्वदूर प्रसार अत्यंत निष्ठेने करणाऱ्या, उद्याचा सुजाण नागरिक घडवण्याच्या दृष्टीने धडपडणाऱ्या व्यक्तीच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयाची भूमिका महत्वाची-जिल्हाधिकारी अविनाश पाठक

बीड (प्रतिनिधी) शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, अशा शिक्षण प्रक्रियेमध्ये ग्रंथालयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले. येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात दिनांक ११ मार्च २०२५ रोजी केंद्र सरकार पुरस्कृत प्रधानमंत्री उच्च तर शिक्षा अभियान अंतर्गत महाविद्यालय सक्षमीकरण अनुदान योजनेद्वारे महाविद्यालयाच्या ग्रंथालय व सभागृह इमारत बांधकामाच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र अलूरकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवगिरी प्रांत कार्यवाह धनंजय धामणे हे होते. व्यासपीठावर संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, उपाध्यक्ष सौ. ज्योती ठाकूर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले की महाविद्यालयाच्या सभागृह आणि ग्रंथालयाची इमारत होत आहे ही समाधानाची बाब आहे. सभागृहातून समाज प्रबोधन आणि ग्रंथालयातून ज्ञानार्जन होत असते. शिक्षण प्रक्रियेमध्ये ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. धनंजय धामणे या प्रसंगी बोलताना म्हणाले की महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी या सुविधा उपलब्ध करून देत आहे. यातून प्रबोधन व्हावे, गुणवंत विद्यार्थ्यांची पिढी निर्माण व्हावी. अध्यक्षीय समारोपात डॉ. सुरेंद्र अलूरकर म्हणाले की संस्था विद्यार्थी केंद्रबिंदू म्हणून कार्य करते. विद्यार्थ्यांसाठी या सुविधा उपलब्ध होत आहेत ही आनंदाची बाब आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.रूपाली कुलकर्णी, प्रा. आसावरी राऊत यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी मानले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांनी लिहिलेल्या प्लांट फिजिओलॉजी अँड मेटाबोलिझम या पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे पालक हरीश कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पी. के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, माध्यमिक विभागाचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, प्राथमिक विभागाचे अध्यक्ष एस. एन. कुलकर्णी, मुख्याध्यापक विठ्ठल काळे, मुख्याध्यापिका बालिका देशमुख, संस्थेचे पदाधिकारी, सभासद,विद्यार्थी,शिक्षक प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

तर आपण आजही मुघलांच्या गुलाम गिरीत असतो ! - खा. उदयनराजे भोसले

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात कोणीच मुस्लिम नव्हतं असा दावा भाजप नेते नितेश राणे यांनी केला. तसेच मुस्लिम लोकांकडून मटण खरेदी न करता हिंदू लोकांकडून करा असे वक्तव्यही त्यांनी केलं. हिंदूंनी मल्हार सर्टिफिकेशनच्या माध्यमातून उघडलेल्या दुकानातून मटण खरेदी करावे, असे आवाहन त्यांनी केलं असून त्यामुळे आता राज्यात नवा वाद पेटला आहे. मात्र त्यांच्या या विधानानंतर आता छत्रपती शिवाजी महाराजांचे तेरावे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले (णवरूरपीरक्षश इहीरश्रश) नितेश राणेंना थेट प्रत्युत्तर दिलं आहे. शिवाजी महाराजांनी हिंदू मुस्लिम असा कधी भेदभाव केला नाही, असे उदयनराजे भोसले म्हणाले. तसेच मल्हार सर्टिफिकेशनच्या मुद्यावरही ते स्पष्ट बोलले. मी नॉनव्हेज खात नाही ज्याला खायचं त्यांनी खावं, असा एक टोलाही त्यांनी लगावला. कराड येथे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी आले असता माध्यमांशी बोलत होते

काय म्हणाले उदयनराजे भोसले ?

नितेश राणे यांचं वक्तव्य मी ऐकलं नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीच हिंदू मुस्लिम असा भेदभाव केला नाही. सर्वधर्म समभाव अशीच त्यांची भूमिका होती, संकल्पना होती. त्यांनी जर असा काही भेदभाव केला असता तर आपण आजही मुघलांच्या गुलामगिरीत असतो. हिंदू मुस्लिम असा कधी भेदभाव केला नाही, असा पुनरुच्चार उदयनराजे भोसले यांनी केला. औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण चालले आहे ते खोदून काढा, असं नितेश राणेंना म्हणायचं असेल. मी किती वेळा तरी सांगितलं आहे. तो आक्रमण करायला आला होता. शिवाजी महाराज आणि आपले पूर्वज नसते तर आपण अजून देखील गुलामगिरीत असतो हे विसरू नका. मात्र याचा असा तसा अर्थ काढू नका, असे उदयनराजे भोसले यांनी बजावलं.

मी तर नॉनव्हेज खात नाही त्यामुळे ज्यांना खायचे आहे त्यांनी खावं, असा टोला देखील खासदार उदयनराजे भोसले यांनी लगावला. मटण दुकानांना मल्हार सर्टिफिकेट (चरश्रहरी उर्शीळषळलरींश) देण्याचा निर्धार मात्सोद्योग आणि बंदरेविकास मंत्री नितेश राणे यांनी केला. त्याच पार्श्वभूमीवर उदयनराजे भोसले हे म्हणाले. मल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉमच्या माध्यमातून फक्त हिंदू समाजातील खाटीकांना हे सर्टिफिकेट मिळणार आहे. मल्हार सर्टिफिकेशन नसेल तिथे मांस (चशरीं) खरेदी करू नका, असे आवाहन देखील नितेश राणे यांनी केले होतं.**मल्हार सर्टिफिकेशनवरून मार्तंड संस्थांच्या विश्वस्तांमध्ये मतभेद नाही**दरम्यान मल्हार सर्टिफिकेशनवरून मार्तंड संस्थांच्या विश्वस्तांमध्ये मतभेद नाही, विश्वस्त मंडळाचा मल्हार नावाला पाठिंब आहे, विश्वस्थानच्या बैठकीत बहुमताने निर्णय झाल्याची माहिती समोर आली आहे. राज्यातील मटनाला मल्हार सर्टिफिकेट देण्याचे नितेश राणे यांनी सांगितलं होतं. मात्र यानंतर श्रीमार्तंड देवसंस्थानाच्या विश्वस्थांमध्ये या नावावरून मतभेद पाहायला मिळाले. पण आता श्रीमार्तंड देवसंस्थानाच्यावतीने आपली भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. याबाबत देवस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजीत देवकाते यांनी या योजनेला विश्वस्त मंडळाचा पाठिंबा असल्याच स्पष्ट केलं.

मल्हार सर्टिफिकेशन किंवा झटका मटण म्हणजे काय?

मल्हार सर्टिफिकेशनच्या माध्यमातून हिंदूंची मटण चिकनची दुकाने उघडली जातील. मल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉम च्या माध्यमातून हिंदू समाजातील खाटिक वर्गांना प्रमाणपत्र मिळणार आहेत. मटण विकणारा हिंदूच असेल आणि मटणात भेसळ नसेल असा दावा आहे. तसेच हिंदूंनी मल्हार सर्टिफिकेशनच्या माध्यमातून उघडलेल्या दुकानातून मटण खरेदी करावी असं आव्हान नितेश राणे यांनी केला

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com